# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

## साहेबरावजी बुट्टपाटील स्मृती व्याख्यानमाला

सकाळ
शनिवार, ३० जानेवारी २०१६
३



ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर धोकादायक आहे, त्यामुळे ग्रामीण भागातच स्वयंरोजगार निर्मितीवर भर दिला पाहिजे.
– डॉ. अनिल काकोडकर, ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ

# स्वयंरोजगार निर्मितीवर भर हवा

## डॉ. अनिल काकोडकर यांचे राजगुरुनगरमध्ये प्रतिपादन

**राजगुरुनगर, ता. २९ :** ''सध्या ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर धोकादायक आहे, त्यामुळे आर्थिक विषमता वाढीस लागण्याची भीती आहे. त्यासाठी ग्रामीण भागातच स्वयंरोजगार निर्मितीवर भर दिला पाहिजे,'' असे प्रतिपादन अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनी केले.



**राजगुरुनगर (ता. खेड) : साहेबराव बुट्टे पाटील व्याख्यानमालेत बोलताना डॉ. अनिल काकोडकर.**

राजगुरुनगर (ता. खेड) येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित केलेल्या साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'सर्वांगीण ग्रामीण विकास : काही संकल्पना' या विषयावर डॉ. काकोडकर बोलत होते. या वेळी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, संचालक शांताराम घुमटकर, हरिभाऊ सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. बी. शिंदे, प्रा. ए. जी. कुलकर्णी उपस्थित होते.

ते म्हणाले, '' शेतीवर उपजीविका करताना स्वयंरोजगाराला प्राधान्य देण्याची गरज आहे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी शहरात मिळणाऱ्या सुविधा त्यांना मिळायला हव्यात. शेती संशोधनासाठी पोषक वातावरण तयार होऊन कृषी विज्ञान केंद्रे जागोजागी तयार व्हायला हवीत. शेतीसंदर्भात नवनवीन तंत्रज्ञान विकसित होऊन त्याची ओळख परिसरातील शेतकऱ्यांना व्हायला हवी. शेतकऱ्यांना प्रशिक्षणाची आणि त्यांचे प्रश्न सोडविण्याची कायमस्वरूपी व्यवस्था तयार व्हायला हवी. त्यासाठी ज्ञानयुगाचे विकेंद्रीकरण झाले, तरच ग्रामीण शहरी समाज जीवनातील अंतर कमी व्हायला मदत होईल. आपली अर्थव्यवस्था ज्ञानयुगाशी जोडणे गरजेचे आहे. नवीन तंत्रज्ञानामुळे वेळ, स्थळ यांची मर्यादा न पाळता आपण या ज्ञानयुगात काम करू शकतो. या ज्ञानयुगासाठी आपण तयारी करणे गरजेचे आहे.''

भारतीय अर्थव्यवस्थेला पुढे नेण्यासाठी खेड तालुका पथदर्शी असल्याचे गौरव उद्गार त्यांनी काढले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख